# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/०६४/२००९

अर्जदार : श्री रामचंद्र जगन्नाथ निबांळकर
मार्फत मुकेश मुरलीधर निबांळकर
रा. कोष्टीपूरा, सिताबर्डी,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
कॉग्रेसनगर विभाग,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती :

1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्री एस.एफ.लांजेवार
कार्यकारी अभियंता तथा
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

— आदेश —

पारीत दि. २३.१२.२००९

ग्राहक गा—हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक ०५.११.२००९ रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराच्या गा—हाण्याचा तपशील :—

सदर तक्रार अर्जकर्त्याने ०५.११.२००९ रोजी दाखल केलेली आहे त्यांचे म्हणणे असे आहे की गैरअर्जदाराने मीटरचे रिडींग चुकीचे दाखवून अवाढव्य विज आकारणी केलेली आहे. ग्राहकाचे माहे मे 2009 पासुन ऑगष्ट 2009 पर्यतचे वीज बिल दुरूस्ती करून अवाढव्य आकारणी झाल्यामुळे योग्य ते सरासरी बिल आकारण्याची मागणी केलेली आहे.

अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षात दिनांक २४.०९.२००९ रोजी तक्रार केली होती. परंतु तक्रारीचे निवारण झालेले नाही.

गैरअर्जदाराने त्यांचे लिखीत म्हणणे दि. ०९.१२.२००९ रोजी सादर केले. सदर गा—हाण्याचे उत्तर दिलेले असुन ग्राहक क्रं. 410010687865/3 आहे. माहे मे पासुन देयक चुकीचे निघाले त्याला कारण चुकीचे मिटर रिडींग आहे. ऑगष्टला ग्राहकाचे मिटरचे योग्य रिडींग झाले त्यामुळे माहे मे ते ऑगष्ट असे 4 महीन्याचे बील ग्राहकास तयार करून दिलेले आहे व वीज देयके 4 महीन्यात विभागण्यात आले आहे आणि सरासरी नुसार देयके देण्यांत आली त्यामुळे ऑगष्ट महिन्याचे बील योग्य आहे असे गैरअर्जदाराचे म्हणणे आहे.

मंचाने दोन्ही पक्षकाराचे म्हणणे 15.12.2009 रोजी एकुण घेतले.

अर्जदाराने बिल दुरूस्त करून देण्याबाबत तसेच एक रकमी बिल पाठविले आहे ते योग्य प्रमाणांत विभागणी करून लागलेला अतिरिक्त भार कमी करून देण्याबाबत विनंती केली.

अर्जदाराने सुनावणीच्या वेळेस सुध्दा पत्रात नमुद केलेले मुद्दे तसेच योग्य प्रमाणात बिल मिळण्यासंबधी निवेदन कथन केले व बिल भरण्यासंबधी हप्ते पाडुन देण्याची विनंती केली.

गैरअर्जदाराने सुनावणीच्या वेळेस सांगितले की अर्जदाराचे बिल विभागणी करूनच दुरूस्त करून देण्यात आलेले आहे व ते त्याप्रमाणे आता कोणताच जादा बोजा ग्राहकावर लावण्यांत आलेला नाही असे सांगितले.

मंचानी दोन्ही पक्षाची बाजु ऐकुण खालील निर्णय दिला.

## निर्णय

सदर तक्रार अर्ज अशंतः मंजूर करण्यांत येत आहे.

1. अर्जदाराला योग्य व अचुक बिल ताबडतोब देण्यांत यावे.
2. अचुक बिलाचे समान तीन हप्ते देण्यांत यावे.

सदर तक्रार अर्ज अशंतः मंजूर करण्यांत येत आहे.

गैरअर्जदाराला आदेश देण्यात येत आहे की कार्यवाही बाबतचा पुर्तता अहवाल हया मंचास आदेश पारीत केल्याचा तारखे पासुन 30 दिवसांचे आत कळवावा.

| सही/– | सही/– | सही/– |
|---|---|---|
| (एस.एफ. लांजेवार) | (श्रीमती गौरी चांद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या | सभापती |

ग्राहक गा–हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

सदस्या
ग्राहक गा—हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.